**नि.दि.मु.क्र.७३/२०१३ मधील निशाणी क्र.३२० वरील आदेश**

**(CNRNo.MHSI080005822013)**

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी प्रतिवादी क्र.१४ दिलीप अनंत गांधी हे मयत असल्याने त्यांचे वारस दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे.

०२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, वादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१४ हे दि.२८/०८/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. तर सदरचा अर्ज दि.०९/११/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तूत अर्ज हा मुदतीत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. प्रस्तूतचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस १४(अ) ते १४(क) हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.३२० हा मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **आ दे श** –

०१. निशाणी क्र.३२० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१४ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी.

०३. वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी नियमाप्रमाणे दावा दुरूस्ती प्रत दाखल करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.02.25 17:39:54 +0530

(शुभम जी. लटुरिया)

दिनांक : २५/०२/२०२६

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय

वैभववाडी